## <u>नि.दि.दा.क्र.२१/२०२०, अर्ज निशाणी ७८ खालील आदेश</u>

(CNR MHSI090001282020)

०१. सदर अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.०३ यांनी त्यांचे विरुध्द झालेला ''एकतर्फा'' आदेश बाजुला सारुन, त्यांची कैफीयत दाखल करून घेण्यासाठी विनंती केली आहे.

०२. अर्ज व त्यावरील वादीचे म्हणणे यांचे अवलोकन केले. उभयपक्षांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

०३. सदर दावा वाटपाकरीता दाखल करण्यात आला आहे. सदरचा दावा गुणावगुणावर निकाली होणे गरजेचे व आवश्यक आहे. न्यायतत्वाच्या दृष्टीकोनातून दाव्याचे स्वरुप पाहता प्रस्तुत प्रतिवादी यांना याच न्यायालयात त्यांची बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक वाटते. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी दिल्यास वाद मुद्दयाचे निवारण गुणवत्तेवर होणार आहे. त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी नाकारल्यास नैसर्गिक न्यायतत्वाचे विरूध्द होईल. त्यामुळे त्यांना न्यायदान नाकारल्यासारखे होणार आहे. परंतू, झालेल्या विलंबाबात प्रस्तूत प्रतिवादींनी वादीस खर्च देणे उचित दिसते. सबब, प्रस्तुतचा अर्ज खर्चासह मंजूर होणेस पात्र आहे. करीता, खालील प्रमाणे आदेश :

**:: <u>आदेश</u> ::**

१. निशाणी क्र.७८ वरील अर्ज खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी क्र.०३ यांनी खर्च म्हणुन रक्कम रु.२००/-(रूपये दोनशे फक्त) वादींना द्यावे.

३.  आदेशाची पुर्तता पुढील तारखेपर्यंत न केल्यास आदेश आपोआप रद्द झाल्याचे समजावे.

Digitally signed by SUNIL BABASAHEB WALKE
Date: 2022.11.21 13:48:47 +1000

दिनांक – १९/११/२०२२  (एस.बी.वाळके)

स्थळ – देवगड  दिवाणी न्यायाधीश क.स्तर देवगड.